## WOCKHARDT LIMITED

**Registered Office:** D-4 MIDC, Chikalthana, Aurangabad - 431 006 **Telephone:** 91-240-6694444; **Fax:** 91-240-2489219
**Global Headquarters:** Wockhardt Towers, Bandra Kurla Complex, Bandra (E), Mumbai - 400 051
**CIN:** L24230MH1999PLC120720
**Email:** investorrelations@wockhardt.com; **Website:** www.wockhardt.com

WOCKHARDT | LIFE WINS

## NOTICE

Members are hereby informed that pursuant to Section 110 of the Companies Act, 2013 read with Rules 20 and 22 of the Companies (Management and Administration) Rules, 2014, as amended, and Regulation 44 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, the Company is seeking consent of its members in respect of the Special Business detailed in the Notice of Postal Ballot dated 4th May, 2017 by way of Special Resolution which includes voting by electronic means.

The Company has on 9th May, 2017 completed dispatch of Notice of Postal Ballot along with the Postal Ballot Form and postage pre-paid self-addressed envelope to the members at their registered addresses. The Notice of Postal Ballot have been sent in the electronic mode to the members (other than who have requested for physical copy) on 8th May, 2017 at their e-mail address as registered with the Depository Participant or the Company. The said Notice of Postal Ballot is also available on the Company's website: www.wockhardt.com; and website of National Securities Depository Limited ('NSDL'): www.evoting.nsdl.com.

The Board of Directors have appointed Mr. Virendra Bhatt, Practicing Company Secretary, as the Scrutinizer for conducting the Postal Ballot and e-voting process in a fair and transparent manner.

The Company has engaged the services of NSDL for the purpose of providing e-voting facility to all its members. The instructions of e-voting are mentioned in the said Notice of Postal Ballot. The members have an option to exercise their vote by way of e-voting or physical Postal Ballot Form. In case the members cast their votes through both the modes, the votes cast through e-voting shall prevail and the votes cast through physical Postal Ballot Form shall be considered as invalid. The e-voting facility can be availed by logging on to NSDL's e-voting website www.evoting.nsdl.com.

The Notice of Postal Ballot has been sent to those members whose names appear in the Register of Members / Beneficiary Position maintained by the Depositories as on Thursday, 4th May, 2017. Voting rights shall be reckoned on the paid-up value of equity shares registered in the name of the members as on Thursday, 4th May, 2017. In case of non-receipt of Postal Ballot Form, a member as on the aforesaid date, may request for duplicate Postal Ballot Form to the Company's Registrar and Transfer Agents ('RTA') viz. Link Intime India Private Limited, C-101, 247 Park, LBS Marg, Vikhroli (West), Mumbai - 400 083. Members who have received the Notice of Postal Ballot by e-mail and who do not wish to avail the e-voting facility may send a request for obtaining the physical Postal Ballot Form from the Company's RTA.

The voting period begins on **Wednesday, 10th May, 2017 at 9.00 a.m.** (IST) and ends on **Thursday, 8th June, 2017 at 5.00 p.m.** (IST). The e-voting module shall be disabled by NSDL for voting thereafter. In case voting by Postal Ballot, members are requested to send the Postal Ballot Form, duly completed and signed so as to reach the Scrutinizer not later than **5.00 p.m.** (IST) on **8th June, 2017**. Postal Ballot Forms received after the said time and date shall not be valid and will be treated as if reply from the members have not been received.

In case of any queries/grievances relating to voting by Postal Ballot including voting by electronic means, you may refer Frequently Asked Questions for Members and e-voting user manual for Members available at the Downloads section of website www.evoting.nsdl.com or contact Mr. Rajiv Ranjan, Assistant Manager, NSDL, at the designated email Ids: evoting@nsdl.co.in or RajivR@nsdl.co.in or call on toll free no.: 1800-222-990.

The results of the Postal Ballot will be announced at the Company's Global Headquarters, Mumbai, on or before **Friday, 9th June, 2017 by 5.00 p.m.** The Results declared along with the Scrutinizer's Report shall be placed on the Company's website www.wockhardt.com & on the e-voting website of NSDL and shall also be communicated to the Stock Exchanges on which shares of the Company are listed.

To support green initiative and to receive communications from the Company in electronic mode, members who have not registered their e-mail address so far, are requested to register the same with their DP, if shares are held in demat form. Members holding shares in physical form are requested to register their e-mail address with the Company / RTA by quoting their folio number(s).

For Wockhardt Limited
Narendra Singh
Company Secretary

Place: Mumbai
Date: 9th May, 2017

# वोक्हार्ड लिमिटेड

WOCKHARDT | LIFE WINS

नोंदणीकृत कार्यालय: डी-४ एमआयडीसी, चिखलठाणा, औरंगाबाद - ४३१ ००६
दूरध्वनी : ९१-२४०-६६९४४४४; फॅक्स : ९१-२४०-२४८९२९९
जागतिक मुख्यालय : वोक्हार्ड टॉवर्स, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
सीआयएन : एल२४२३०एमएच१९९९पीएलसी १२०७२०
ईमेल आयडी : investorrelations@wockhardt.com, वेबसाइट: www.wockhardt.com

## नोटीस

कंपनी अधिनियम, २०१३ चे कलम ११० तसेच कंपनी (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ ह्यांचे नियम २० आणि २२, सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे, आणि सेबी (सूचीकरण आबंधने आणि प्रकटीकरण आवश्यकता), नियमने, २०१५ चे नियमन ४४ ह्यांच्या अनुरोधाने ह्याद्वारे सभासदांना सूचित करण्यात येत आहे की, कंपनी ही ४ मे २०१७ तारखेच्या टपाल मतदान नोटिशीमध्ये नमूद करण्यात आलेल्या विशेष कामकाजाच्या संबंधात आपल्या सभासदांकडून विशेष ठरावांच्या माध्यमातून संमती प्राप्त करण्यास इच्छुक आहे, ह्यामध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करणे देखील समाविष्ट आहे.

कंपनीने आपल्या सभासदांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर टपाल मतपत्रिका आणि पोस्टेज प्रीपेड सेल्फ - अॅड्रेस्ड लिफाफ्यासह टपाल मतदानाची नोटीस पाठविण्याची प्रक्रिया ९ मे २०१७ रोजी पूर्ण केलेली आहे. सभासदांनी (वास्तविक प्रतीसाठी विनंती करणाऱ्या सभासदांखेरीज) डिपॉझिटरी पार्टिसिपन्टकडे किंवा कंपनीकडे नोंदणीकृत असणाऱ्या त्यांच्या ईमेल अॅड्रेसवर ८ मे २०१७ रोजी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने टपाल मतदानाची नोटीस पाठविण्यात आलेली आहे. टपाल मतदानाची सदर नोटीस ही कंपनीच्या www.wockhardt.com ह्या वेबसाइटवर आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडच्या ('NSDL'): www.evoting.nsdl.com ह्या वेबसाइटवरदेखील उपलब्ध आहे.

टपाल मतदान आणि ई-मतदान प्रक्रिया न्याय्य व पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी संचालकीय मंडळाने श्री. विरेंद्र भट, कार्यरत कंपनी सचिव ह्यांची परिनिरीक्षक म्हणून नियुक्ती केलेली आहे.

कंपनीने तिच्या सर्व सभासदांना ई-मतदान सुविधा प्रदान करण्याच्या हेतूसाठी NSDL च्या सेवांचा वापर केलेला आहे. टपाल मतदानाच्या सदर नोटिशीमध्ये ई-मतदानाच्या सूचनांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. सभासदांना ई-मतदानाद्वारे किंवा वास्तविक टपाल मतदान प्रपत्राद्वारे त्यांचे मतदान करण्याचा पर्याय उपलब्ध आहे. सभासदांनी त्यांचे मतदान दोन्ही प्रकारे केल्यास, ई-मतदानाद्वारे करण्यात आलेले मतदान अभिभावी राहील आणि वास्तविक टपाल मतपत्रिकेद्वारे करण्यात दिलेली मते अवैध ठरतील. NSDL च्या ई-मतदान वेबसाइटवर म्हणजेच www.evoting.nsdl.com येथे लॉगिन करून ई-मतदान सुविधेचा लाभ घेता येऊ शकेल.

गुरूवार, ४ मे २०१७ रोजी सभासदांच्या नोंदवहीमध्ये / डिपॉझिटरीद्वारे बाळगण्यात येणाऱ्या लाभार्थी स्थितीमध्ये ज्या सभासदांची नावे आहेत, त्यांना टपाल मतदानाची नोटीस पाठविण्यात आलेली आहे. गुरूवार, ४ मे २०१७ रोजी सभासदांच्या नावे नोंदणीकृत करण्यात आलेल्या समभागांच्या भरणा झालेल्या मूल्यावर मतदानाचे हक्क विचारात घेण्यात येईल. टपाल मतपत्रिका प्राप्त न होण्याच्या बाबतीत, पूर्वोक्त तारखेला सभासद असणारी व्यक्ती, कंपनीच्या रजिस्ट्रार व निबंधक एजन्टसकडून ('RTA') म्हणजेच लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, सी-१०१, २४७ पार्क, एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई - ४०० ०८३ ह्यांच्याकडून टपाल मतपत्रिकेच्या प्रतिलिपी प्रतीसाठी विनंती करू शकेल. ई-मेलद्वारे टपाल मतदानाची नोटीस प्राप्त झालेले आणि ई-मतदान सुविधेचा लाभ घेण्यास इच्छुक नसणारे सभासद हे कंपनीच्या RTA कडून वास्तविक टपाल मतपत्रिका प्राप्त करण्यासाठी विनंती करू शकतील.

मतदानाच्या कालावधीला **बुधवार १० मे २०१७ रोजी सकाळी ९.०० वाजता** (IST) सुरूवात होईल आणि तो **गुरूवार, ८ जून २०१७ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता** (IST) समाप्त होईल. त्यानंतर NSDL द्वारे मतदानासाठी ई-मतदान मॉड्युल अकार्यान्वित करण्यात येईल. टपाल मतदानाच्या बाबतीत, यथोचितरीत्या पूर्ण केलेली आणि स्वाक्षरीकृत केलेली टपाल मतपत्रिका ही परिनिरीक्षकांकडे **८ जून २०१७ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत** (IST) पोहोचायला हवी. सदर वेळेनंतर आणि तारखेनंतर प्राप्त झालेल्या टपाल मतपत्रिका अवैध ठरतील तसेच सभासदांकडून जणू उत्तर प्राप्तच झाले नाही असे समजले जाईल.

इलेक्ट्रॉनिक पद्धतीच्या मतदानासह टपाल मतदानाद्वारे मतदान करण्याशी संबंधित कोणत्याही प्रश्नांसाठी /तक्रारींसाठी, तुम्ही सभासदांसाठीचे वारंवार विचारले जाणारे प्रश्न आणि www.evoting.nsdl.com ह्या वेबसाइटच्या डाउनलोड विभागामध्ये उपलब्ध असणाऱ्या सभासदांसाठीच्या ई-मतदान वापरकर्ता पुस्तिकेचा संदर्भ घेऊ शकता किंवा श्री. राजीव रंजन, साहाय्यक व्यवस्थापक, NSDL ह्यांना निर्देशित ईमेल आयडीवर :evoting@nsdl.co.in किंवा RajivR@nsdl.co.in येथे किंवा टोल फ्री क्र.:१८००-२२२-९९० वर संपर्क साधू शकता.

टपाल मतदानाचे निकाल हे कंपनीच्या मुंबई येथील जागतिक मुख्यालयामधून, **शुक्रवार, ९ जून, २०१७ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता** किंवा त्यापूर्वी घोषित करण्यात येतील. परिनिरीक्षकांच्या अहवालासह घोषित करण्यात आलेले निकाल हे कंपनीच्या www.wockhardt.com ह्या वेबसाइटवर आणि NSDL च्या ई-मतदान वेबसाइटवर प्रदर्शित करण्यात येतील आणि जेथे कंपनीचे शेअर्स सूचीबद्ध आहेत, त्या स्टॉक इक्स्चेंजेसकडेही कळविण्यात येतील.

हरित उपक्रमाला पाठिंबा देण्यासाठी आणि कंपनीकडून इलेक्ट्रॉनिक पद्धतीने संपर्कव्यवहार प्राप्त करण्यासाठी, ज्या सभासदांनी अद्याप त्यांचे ई-मेल अॅड्रेस नोंदणीकृत केलेले नाहीत आणि जर ते सभासद डिमॅट स्वरूपात शेअर्स धारण करत असतील तर, त्यांना त्यांच्या डीपीकडे सदरची नोंदणी करण्याची विनंती करण्यात येत आहे. वास्तविक स्वरूपात भागधारणा करणाऱ्या सभासदांना त्यांचा फोलिओ क्रमांक नमूद करून त्यांचे ई-मेल अॅड्रेस कंपनी / RTA कडे नोंदवण्याची विनंती करण्यात येत आहे.

वोक्हार्ड लिमिटेड साठी
नरेंद्र सिंग
कंपनी सचिव

स्थळ : मुंबई
दिनांक : ९ मे, २०१७